## निशाणी १८२ खालील आदेश

१. प्रतिवादी नं.१ व २ यांनी जादा मुद्दे काढणेबाबत अर्ज दाखल केला आहे.

२. सदरकामी मे. कोर्टाने निशाणी २४ वर मुद्दे काढलेले आहेत. सदरचे मुद्दे काढलेनंतर वादीने दावा दुरुस्त केलेला होता. त्यास प्रतिवादी यांनी दुरुस्त दाव्यास कैफियत दिलेली होती. मात्र दुरुस्त कैफियतीनुसार याकामी मुद्दे निघालेले दिसुन येत नाहीत. त्यामुळे या दाव्याच्या कामी दावा मिळकत गट नं.५३/२ अशी मिळकत यातील प्रतिवादी नं.१ व २ यांचे वडील भिमराव यांची स्वतंत्र कुळ मालकी हक्काची सेल सर्टीफिकेटनुसार मिळाली आहे का याबाबत मुद्दा काढणेत यावा. तसेच याकामी प्रतिवादी यांनी त्यांचे कैफियतमध्ये गट नं. ५३/२ बाबत याच मे. कोर्टात दुसरा दावा झालेला होता. त्यामुध्ये तडजोड झालेली होती. सदरील गटाबाबत तडजोड झालेल्या व्यक्ती चंदाराणी देशमुख यांना पक्षकार केलेले नव्हते व नाही. शिवाय दावा मिळकतीमधील अन्य व्यक्तीना पक्षकार केलेले नाही. त्यामुळे वादीच्या दाव्यास नॉन जॉईंडर ऑफ नेसेसरी पार्टीज या कायदेशीर तत्वाची बाधा येते अशी तक्रार घेतली होती. मात्र त्याबाबत देखील मुद्दा दिसुन येत नाही. त्यामुळे वरीलप्रमाणे प्रतिवादी यांनी उपस्थित केलेले जादा मुद्दे याकामी काढणेत यावेत अशी विनंती केली.

३. वादी यांनी प्रतिवादीच्या जादा मुद्दे काढणेबाबतच्या अर्जास आपले म्हणणे

दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार सदरच्या अर्जातील मजकुर मान्य नाही कबुल नाही. सदरकामी मे. कोर्टानी नि.२४ ला मुद्दे काढले असुन त्यातील मुद्दा क्र.१ पाहता त्यामध्ये वादींनी दावा मिळकत वाडवडीलार्जित आहे का नाही याबाबत मुद्दा मध्ये उखल होणार आहे. त्यामुळे प्रतिवादींनी दिलेले मुद्दे नव्याने काढण्याची गरज नाही. उलट याविषयीची जबाबदारी डॉक्युमेंटस् आधारे करता येते. दावा चालु असताना प्रतिवादींनी पुरावा निर्माण करणेकरीता रे.दि.मु.नं. ५२/२००२ दाखल करुन त्याकामी खोटी तडजोड अंमलात आणली आहे. तरी प्रतिवादीचा अर्ज रद्द करणेत यावा अशी विनंती केली.

४.        दोन्ही बाजुंचे म्हणणे व युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादीने त्याच्या दाव्यामध्ये सदर दाव्यात केलेले पक्षकार अपुरे असुन आणखी आवश्यक पक्षकारांना वादींनी या दाव्यात प्रतिवादी म्हणुन सामील केलेले नाही असे दुरुस्ती लेखी म्हणणे नि.४४ कडे दाखल केलेले आहे. तसेच दावा मिळकत गट नं. ५३/२ व १८७ या मिळकती प्रतिवादी नं.१ व २ व त्यांचे पुर्वहक्कदार वडील भिमराव यांचे वहिवाटीत व कब्जे वहिवाटीत मालकी हक्काने पुर्वापार होत्या व आहेत असे लेखी म्हणणे कैफियतीच्या परिच्छेद क्र.७ मध्ये दाखल केलेले आहे. परंतु नि.२४ वरील मुद्यामध्ये मुद्दा क्र. ३ मध्ये केवळ वादमिळकत १८७ बाबतचाच वादमुद्दा काढण्यात आला. परंतु दुरुस्तीनंतर त्यामध्ये दुरुस्ती करुन गट नं.५३/२ हा समाविष्ट केल्याचे दिसुन येत नाही. तसेच प्रतिवादी नं.२ च्या कैफियतीनुसार सदर दाव्यात आवश्यक पक्षकार न केल्याची बाधा येते. याबाबतचासुध्दा

मुद्दा निघालेला दिसुन येत नाही. त्यामुळे प्रतिवादी नं.१ व २ यांच्या लेखी कैफियतीनुसार सदरचे मुद्दे दाव्याच्या निर्णीतीकरीता निघणे आवश्यक आहे. सबब खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी नं.१ व २ यांचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. नि. २४ वरील मुद्दा क्र.३ मध्ये गट नं.१८७ च्या नंतर गट नं.५३/२ असा दुरुस्तीने समाविष्ट करण्यात यावा

३. सदर दाव्यास आवश्यक पक्षकार न केल्याची बाधा येते काय? हा मुद्दा काढण्यात यावा.

४. खर्चाबाबत काही आदेश नाहीत.

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2024.03.12 17:11:05 +0530

आटपाडी.                **( अनंत रा. टेंगसे )**
दि.१२.०३.२०२४                सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, आटपाडी

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - A. A. Jamadar
Court - Jt. Civil Judge Jr.Dn. Atpadi.
Date - 12.03.2024
Order signed by the
Presiding Officer on - 12.03.2024
Order uploaded on - 12.03.2024